# याकोब

James

# याकोब

*याकोबाचे पत्र - अध्ययन*

## 1

[1] परमेश्वर आणि प्रभू येशू ख्रिस्तांचा दास याकोब याच्याकडून बारा वंशातील त्या सर्व लोकांस जे इकडेतिकडे
विखुरलेले आहेत, त्यांना शांति.
[2] हे माझ्या बंधुभगिनींनो, जेव्हा तुमच्यावर वेगवेगळया प्रकारच्या परीक्षा येतात आणि जेव्हां तुम्ही त्यांचा सामना
करिता, तेव्हा तुम्ही ती परीक्षा म्हणजे एक आनंदाची बाब मानावी. [3] या गोष्टीविषयी तुम्ही अजाण नाहीये की जेव्हा
तुमचा विश्वास पारखला जातो तेव्हा धीराचा आरंभ होतो. [4] पहा, धीराला आपले संपूर्ण कार्य करू द्यावे, म्हणजे तुम्ही
परिपूर्ण व सिद्ध व्हावे आणि तुमच्यात कोणतीही उणीव राहू नये.
[5] जर तुमच्यापैकी कोणालाही बुद्धीची (ज्ञान) उणीव असेल, तर त्याने परमेश्वराजवळ ती मागावी. परमेश्वरच सर्वांना
कोणतीही नाराजी व तक्रार न करिता,उदारपणे बुद्धि व ज्ञानाची देणगी देतो. [6] पण मागणाऱ्याने शंकेवाचून विश्वासाने
मागावे, कारण संशय धरणारा समुद्राच्या लाटेसारखा आहे, जी वाऱ्याने लोटली जाते आणि हेलकावून उचंबळत असते.
[7] प्रभू त्याला काही देतील (मिळेल) असा विचार संशयी मनुष्याने मनी बाळगू नये. [8] असा मनुष्य संशयी असल्यामुळे
आपल्या संपूर्ण जीवनकाळात अस्थिर व डळमळीत अवस्थेतच असतो.
[9] लीन व दीन स्तरीय विश्वासीने (ख्रिस्ती), आपल्या उच्च स्थितीविषयीचा (पद) अभिमान बाळगून आनंदित रहावे.
[10] परंतु श्रीमंताने आपल्या दीन दशेविषयी गर्व बाळगावा व आनंदित रहावे कारण तो 'गवताच्या फुलासारखा' नाहीतसा
होईल. [11] सूर्य आपल्या तीव्र व रखरखीत उष्णतेने तापलेला असा उदयास येतो, आणि तो गवत सुकवून टाकतो व
त्याचे फूल खाली पडून नाहीसे होते, त्याचे सौंदर्य नष्ट होऊन संपून जाते; याप्रमाणे धनवान देखील आपल्या मार्गाने
चालत राहील, आपल्या शैलीने जीवन जगून एके दिवशी मरून जाईल.
[12] जो मनुष्य परीक्षेत टिकून राहतो, तो खरोखर आशीर्वादित आहे, कारण परीक्षेत खरा उतरल्यावर तो (भीषण
प्रतिकूल परिस्थितीत तो टिकून राहिला) जीवनाचा मुगूट मिळवील ज्याची प्रतिज्ञा येशूंनी त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांना
देऊ केलेली आहे.
[13] जेव्हा जेव्हा एखाद्याची परीक्षा होत असते तेव्हा तेव्हा त्याने/तिने असे म्हणू नये की परमेश्वर मला परीक्षेत पाडीत
आहे. वाईट गोष्टीत परमेश्वर कोणालाही परीक्षेत पाडत नाही आणि तो स्वतः कोणालाही मोहांत अडकवीत नाही.
[14] प्रत्येक मनुष्य आपल्या वासनेने ओढला जातो आणि वासना त्याला भुरळ (प्रलोभन) पाडते. [15] मग वासना गर्भवती
होऊन अपराधाला जन्म देते आणि जेव्हा अपराध वाढत जातो तेव्हा तो त्याला (मनुष्याला) मरणापर्यंत पोहचवितो.
[16] माझ्या प्रिय बंधूभगिनींनो, फसू नका, दिशाहीन होऊन मार्ग चुकू नका, [17] प्रत्येक सिद्ध देणगी, प्रत्येक उत्तम दान
ज्योतिंचा परमेश्वर, ज्याने त्यांची निर्मिती केली त्या पित्यापासून आहे. होय, तोच परमेश्वर जो स्थिर आहे आणि कधीही
बदलत नाही. [18] निर्माण (रचना) केलेल्या सर्व वस्तुंतील आपण सर्वांनी प्रथम फळ व्हावे म्हणून परमेश्वराने आपल्या
स्वेच्छेने, सत्यवचनाद्वारे आपल्याला नवा जन्म दिला.
[19] माझ्या भाऊबहिणींनो, तुम्हांला याविषयी कळते म्हणूनच प्रत्येक माणसाने ऐकावयास उत्सुक आणि बोलावयास
धीमा आणि क्रोध करण्यास मंद असावे. [20] कारण की जे काही परमेश्वराच्या दृष्टीने योग्य व बरोबर आहे, ते सर्व तुमचा
क्रोध साध्य करु शकत नाही. [21] म्हणून तुमच्या जीवनात जो गलिच्छपणा, दुष्टाई आणि कुजत जाण्याचा भाव आहे तो
दूर करा (सोडा) ,आणि जो संदेश (येशू-वार्ता) तुमच्या अंतःकरणात पेरला जातो तो नम्रतेने स्वीकारीत चला. हा संदेश
तुमच्या जीवाच्या (बुद्धि, इच्छाशक्ति आणि भावना) विकासात साहाय्यक सिद्ध होऊ शकतो.
[22] बायबलच्या वचनांतून तुम्ही जे काही शिकला त्या वचनांनुसार आचरण करत रहा. ऐकून त्याप्रमाणे न करणारे,

स्वतःची फसवणूक करितात, 23 कारण जो कोणी वचन (बायबल) ऐकतो आणि तसे करीत नाही तो मनुष्य त्या
मनुष्यासारखा आहे जो आरशात आपला चेहरा पाहतो; 24 आणि चेहरा पाहिल्यानंतर तो विसरून जातो की मी कसा
दिसत होतो. 25 परंतु जो मनुष्य परमेश्वराच्या सिद्ध इच्छेनुसार करण्याचे विसरत नाही, त्याच्या कार्यांचा परिणाम फायदा
देणारा (आशीर्वादित) होईल.
26 ज्याला आपल्या जिभेवर आळा घालता येत नसेल आणि जर तो स्वतःला धार्मिक समजत असेल, तर तो धोक्यात
आहे आणि त्याचे नीतिमत्व व धार्मिकपणा बेकार व व्यर्थ आहे. 27 आपल्या परमेश्वर पित्याच्या दृष्टीने शुद्ध, स्थायी-
धार्मिकपणा (भक्ति) म्हणजे: अनाथ व विधवांच्या संकटांत त्यांचे साहाय्य (खबरबात घेणे) करणे आणि जगाच्या
भ्रष्टाचारांपासून स्वतःला निष्कलंक राखणे हेच होय.

# 2

1 माझ्या भाऊबहिणींनो, तुम्ही थोर प्रभू येशूंचे शिष्य आहा म्हणून कोणाशीही पक्षपाताने वागू नका. 2 उदाहरणार्थ:
समजा तुमच्या सभेत एक मनुष्य महागडे कपडे आणि आभूषणें घालून व दुसरा मनुष्य गरीब असल्यामुळे
भिकार-फाटक्या कपड्यात येतो, 3 व जर तुम्ही धनवानाला बसण्यासाठी चांगली जागा आणि सन्मान देता, पण
गरीबाला खाली बसावयास किंवा उभे राहण्यास सांगता किंवा म्हणता की येथे माझ्या पायाजवळ बैस, 4 यावरून स्पष्ट
स्पष्ट दिसते की नाही, की तुम्ही पक्षपात/भेदभाव ठेवता आणि तुमचे विचार किती वाईट आहेत?
5 माझ्या बंधूभगिनींनो, लक्ष लावून ऐका, या जगात जे गरीब लोक आहेत आणि जर ते गरीब लोक परमेश्वरावर प्रेम
करणारे आहेत, अशांना विश्वासात धनवान होण्यासाठी व प्रतिज्ञा केलेल्या राज्याचे वारीस होण्यासाठी परमेश्वराने
निवडले आहे की नाही? 6 तरीही तुम्ही गरीबांचा अपमान करिता? धनवान लोक तुमचे शोषण करत नाहीत काय? ते
तुम्हांला न्यायालयात ओढून नेत नाहीत काय? 7 ज्या महान येशूंच्या नांवाने तुम्ही ओळखले जाता, ख्रिस्ती म्हणविता,
त्याच येशूंची निंदा ते करत नाहीत काय?
8 होय, हे खरे आहे की बायबलच्या महान आज्ञेचे अर्थात, राजघराण्यांच्या नियमांशी संबंधित आदेशाचे, म्हणजे
दुसऱ्यांवर आपल्यासारखे प्रेम कर. जर या आज्ञेचे पालन तुम्ही खरोखरीच करत आहात, तर ही उत्तम व चांगली गोष्ट
आहे; 9 पण या विपरित जर तुम्ही भेदभाव करिता तर गुन्हा करिता आणि तुम्ही बायबलच्या राजेशाही नियमाचे उल्लंघन
केले म्हणून नियमशास्त्र तुम्हांला दोषी ठरविते. 10 जो मनुष्य एक आज्ञा चुकवितो (एकावाचून सर्व पाळितो), तो अशा
मनुष्यासारखा आहे, ज्याने पूर्ण आज्ञांचे पालन जणू काय केलेच नाही. 11 परमेश्वर ज्याने म्हटले होते की “व्यभिचार करू
नका”, त्याने असे देखील म्हटले आहे की, “खून करू नका”. यास्तव जर तुम्ही एखाद्याचा खून केला, पण व्यभिचार
केला नही तरीही तुम्ही संपूर्ण आज्ञा मोडल्या आहेत.
12 म्हणून स्मरणात असू द्या की जेव्हा कधी तुम्ही काही बोलता किंवा करिता, तेव्हा तुमचा न्याय प्रेमाच्या त्या
नियमाद्वारे होईल जो तुम्हांला मुक्त करील. 13 यास्तव जर तुम्ही दुसऱ्यांप्रत दयाळू रहात नाही, (दुसऱ्यांवर दया करत
नाही) तर तुमच्यावर देखील दया केली जाणार नाही. जर तुम्ही दुसऱ्यांप्रत दयाळू राहिलात, तर तुमच्याविरूद्ध
परमेश्वराचा जो निर्णय आहे, त्यावर परमेश्वरी दये-कृपेचा विजय होईल.
14 प्रिय भाऊबहिणींनो, जर तुम्ही आपल्या क्रियेद्वारे (कार्य) विश्वासाचे प्रमाण देत नसाल तर तुमच्या ‘विश्वास-
दाव्याची’ काय किंमत? त्याचे काय मोल? त्या प्रकारच्या विश्वासाने कोणाचाही लाभ होऊ शकत नाही. 15 समजा,
एखाद्या भाऊ किंवा बहिणीच्या घरी खाण्याची-वस्त्रांची कमतरता आहे, 16 पण त्यांची काळजी न वाहता, त्यांना
भोजन-वस्त्रांचा पुरवठा न करिता, तुम्ही त्यांना म्हटले की “आपली काळजी घ्या, सुख-शांतीने जा, परमेश्वर तुम्हांस
आशीर्वाद देवो, आपली देखरेख व्यवस्थितप्रकारे करा,” तर तुमच्या अशा विश्वासाचा त्यांना किंवा तुम्हांला काय
फायदा आहे? 17 पाहिलेत ना, तुम्ही केवळ विश्वास ठेवणे पुरेसे नाहीये. ज्या विश्वासाला क्रियेची साथ-सोबत नाही; जेथे
विश्वास व क्रिया ही जुळलेली नाहीत, त्या प्रकारचा विश्वास सुद्धा विश्वास म्हणविला जाणार नाही - तो विश्वास व्यर्थ,

निर्जीव व मृत असा आहे.
18 कोणी असे म्हणू शकतो, “तुमच्याजवळ केवळ विश्वास आहे परंतु मी कर्माला अधिक मानतो. तू कर्मावाचून
आपला विश्वास दाखीव, मी आपल्या कर्मांनी आपला विश्वास तुला दाखवीन.” 19 अजूनही तुम्ही असे समजता काय,
की एका परमेश्वरावर विश्वास धरणेच पुरेसे आहे? कोणती मोठी गोष्ट आहे ती? दुष्टात्मा देखील तसाच विश्वास धरतात
आणि थरथर कांपतात.
20 मूर्खांनो! तुम्हांला हे केव्हा कळेल, की ज्या विश्वासाला क्रियेची जोड नाही, सत्कृत्यांची साथ नाही तो विश्वास
निरर्थक असून कुचकामाचा आहे. 21 आपला पूर्वज (बाप) अब्राहाम याने जेव्हा आपला मुलगा इसहाक याला वेदीवर
अर्पण केले, त्याच क्षणी तो परमेश्वराच्या दृष्टीने नीतिमान ठरला होता, याची तुम्हांला आठवण नाही काय? 22 पहा,
त्याचा भरंवसा परमेश्वरावर इतका भक्कम होता की जे काही परमेश्वर म्हणाला, ते सर्व काही करावयास तो तयार झाला.
जेव्हा त्याने तेच केले जे त्याला परमेश्वराने करावयास सांगितले, तेव्हाच (विश्वास-क्रियेशी जुळून) त्याचा विश्वास पूर्ण
मानला गेला होता. 23 म्हणून, जसे बायबलमध्ये लिहिलेले आहे अगदी तसेच झाले. अब्राहामाने परमेश्वरावर विश्वास
ठेवला आणि परमेश्वराने अशी घोषणा केली की तो नीतिमान आहे, इतकेच केवळ नव्हे तर त्याला ‘परमेश्वराचा मित्र’
म्हणण्यात आले. 24 म्हणून तुम्ही पहा, की केवळ आपल्या विश्वासाद्वारे नव्हे, तर क्रियांनी अर्थात जे काही करिता
त्यामुळे परमेश्वराबरोबर आपण एका योग्य नात्यात (समर्थन प्राप्त) बांधले जातो.
25 यौन व्यापार करणारी रहाब देखील याच सत्याचे आणखी एक प्रमाण आहे; जेव्हा तिने त्या जासूदांना दुसऱ्या
मार्गाने सुरक्षित लावून (परतविले) दिले, तिच्या त्याच क्रियेने परमेश्वर व तिचे नाते सुधारिले , आणि एक सुधारलेले
नाते त्यांच्यात कायम झाले. 26 ज्या प्रकारे आत्म्यावाचून देह निर्जीव (मृतवत) आहे, त्याच प्रकारे क्रियेवाचून विश्वास
निर्जीव (मेलेला) आहे.

# 3

1 प्रिय बधूंभगिनींनो, चर्चमध्ये पुष्कळांनी शिक्षक होऊ नये, कारण आपल्यासारखे जे शिकविणारे आहेत, त्यांच्याशी
परमेश्वर अधिक सक्तीने (कठोरपणाने) वागेल, त्यांना गंभीरतेने दंड देईल. 2 आपण सर्वच अनेक चुका करितो, परंतु जो
मनुष्य आपली जीभ आपल्या काबूत ठेवितो, बोलणे नियंत्रित करितो, तोच सिद्ध मनुष्य आहे, आणि तोच प्रत्येक
परिसीमेत आपल्या स्वतःला नियंत्रणात ठेवू शकतो.
3 एक लहानसा लगाम घोड्याच्या तोंडात घातला, की जेथे कोठे आपल्याला हवे, तेथे आपण त्याला घेऊन जाऊ
शकतो. 4 हवा प्रचंड वाऱ्याने कितीही तीव्र असली तरी, एका लहानशा पतवारीने (सुकाणूने) एक जहाज चालक, एका
भव्य-विशाल प्रचंड जहाज त्याला हवे तिकडे फिरवू शकतो. 5 जीभ ही जरी लहानसा अवयव आहे तरी ती भीषण
विध्वंस (आग) आणू शकते, एक लहानशी ठिणगी (पेट) संपूर्ण विशाल जंगल पेटवू शकते. 6 जीभ आगेच्या
ज्वालेसारखी आहे कारण ती दुष्टाईने पुरेपूर भरलेली आहे . ती तुमचे संपूर्ण जीवन नष्ट करू शकते, होय, तेवढे सामर्थ्य
या लहानशा अवयवात आहेच. जीभ तुमच्या जीवनाची अख्खी (एकदंरीत संपूर्णच) दिशा विनाशाच्या भडकणाऱ्या
ज्वालेत बदलून टाकू शकते, कारण जीभ नरकाने पेटविली जाते.
7 सर्व प्रकारचे प्राणी, पक्षी, सरपटणारे प्राणी व मासें मानवाद्वारे वश केले जाऊ शकतात, 8 परंतु जिभेला कोणीही वश
करण्यास समर्थ नाहीये. ती अनियंत्रित दुष्टतेने भरपूर आहे जिच्यात धोकादायक, नव्हे प्राणघाती विष विपुलतेने भरलेले
आहे. 9 कधी कधी ही जीभ आपल्या प्रभूची स्तुति करिते आणि कधी कधी हीच जीभ परमेश्वराच्या समानतेत रचलेल्या
लोकांविरूद्ध विषाचा स्फोट घडविते, मनुष्यांना विषयुक्त शापही देते. 10 परिणाम असा होतो की आशीर्वाद व शाप ही
दोन्ही एकाच मुखाने एकाएकी फुटून-उसळून बाहेर येतात. माझ्या भाऊबहिणींनो, हे अगदी अयोग्य व चुकीचे आहे
आणि ही अजिबात बरोबर गोष्ट नाहीये. 11 पाण्याच्या झऱ्याच्या एकाच उगमातून गोड व खारे, असे दोन्ही प्रकारचे
पाणी उसळून बाहेर येते काय? 12 अंजिराच्या झाडाला, जैतुनांची फळें आणि द्राक्षवेलींना अंजीर येतात काय? नाही,

गोड पाणी खाऱ्या झऱ्यातून निघत नाही.
[13] तुम्ही जर बुद्धीमान आहा, परमेश्वराची पद्धत व शैली तुम्हांला कळत असेल, तर जीवनात आपल्याठायी सदाचाराची व भलेपणाची कृत्यें कायम असू द्या, यासाठी की केवळ सत्कृत्येंच केली जावीत व अहंकार आणि फुशारकीवाचून ही कृत्यें करण्यातच खरे शहाणपण (सुजाणपणा) आहे. [14] पण तुमच्या अंतःकरणात कडू व तीव्र ईर्ष्या आणि स्वार्थमय कामना आहे, म्हणून अहंकार बाळगून सत्याची उपरोधिपणे टवाळी (व्यंग) करू नका. [15] अशा लबाड बुद्धीचा स्त्रोत (उगमस्थान) परमेश्वर तर नाहीच नाही, हे ज्ञान जगिक, शारीरिक व सैतानाकडले आहे. [16] कारण जेथे जेथे मत्सर आणि स्वार्थमय आकांक्षा आहे तेथे तेथे सर्व प्रकारचा गोंधळ, अव्यवस्था व दुष्टाई आहे.
[17] (बुद्धी) पवित्र, मेळ जुळवून आणणारे, कोमल, इतरांची आधीनता स्वीकार करणारे असे शुद्ध-सौम्य असते. हे ज्ञान दया व सत्कर्मांनी (फळवंत झालेले) भरलेले आहे. [18] या ज्ञानाठायी पक्षपात व भेदभाव नाहीये, प्रामाणिकपणा आहे. जे लोक मेळ घडवून आणितात, ते शांतीच पेरतात आणि भलेपणाची कृत्यें अर्थात नीतिमत्वरूपी पीक कापतात.

# 4

[1] तुम्हांमध्ये लढाया व तंटे होण्याचे कारण आहे तरी काय? तुमच्या अंतःकरणात ज्या वाईट (कुइच्छा) इच्छांचा संघर्ष चाललेला असतो त्यामुळेच की नाही? [2] तुम्ही लालसा तर करिता पण तुम्हांला मिळत नाही. तुम्ही हत्या करिता आणि लोभ धरिता, आणि जे तुम्हांला हवे असते (इच्छा) ते तुम्ही प्राप्त करीत नाही कारण तुम्ही असमर्थ ठरता. तुम्हांला याकरता मिळत नाही कारण, तुम्ही दुसऱ्यांकडून चपळाईने हिसका हिसकी करीत असता,कारण पटकन मिळावे हा तुमचा प्रयत्न असतो. तुमच्याजवळ नाही, कारण तुम्ही परमेश्वराकडे मागत नाही. [3] तुम्ही मागता पण तुम्हांला यासाठी ते मिळत नाही, कारण तुम्ही अन्याय्य रीतिने, चुकीच्या मार्गाने व खोटेपणाने अयोग्य इच्छा बाळगून मागता, ते देखील याकरिता की तुम्हांला तुमची इच्छा व चैनबाजी पूर्ण करिता यावी.
[4] हे व्यभिचाऱ्यांनो, तुम्हांला ठाऊक नाही काय की जगाची मैत्री तुम्हांला परमेश्वराचा शत्रु करिते (होता)? मी पुन्हा तुम्हांला सांगतो की जर तुमचा हेतू जगिक चैन व मजा लूटणे हा आहे, तर तुम्ही परमेश्वराचे मित्र होऊच शकणार नाही.
[5] बायबलमध्ये लिहिलेले हे कथन तुम्हांला व्यर्थ वाटते काय की, 'परमेश्वर ज्याने आपल्याठायी पवित्र आत्मा दिलेला (वास करितो) आहे, त्याला हीच उत्कंठा व लालसा असते, की आपण त्याठायी विश्वासयोग्य असावे?' [6] कुइच्छांचा कडकडून विरोध करण्यासाठी व न कचरता हिंम्मती सामना करण्यासाठी, परमेश्वर आमच्यावर अधिकाधिक अनुग्रह व कृपा करत असतो. बायबलमध्ये जसे लिहिलेले आहे त्याप्रमाणे, 'परमेश्वर गर्विष्ठांचा सामना करितो, प्रचंड विरोध करितो, परंतु जो नम्र- लीन असतो त्यावर कृपा करितो.
[7] यास्तव परमेश्वराप्रत आधीन व्हा, सैतानाला तोंड द्या, सामोरे जा, सामना करा आणि पहा की तो कसा तुमच्यापासून दूर पळून जाईल व वचनांचा प्रसार होईल. [8] परमेश्वराच्या समीप या, निकट या, त्याच्या नजीक रहा. त्याची जवळीक साधा म्हणजे तुम्हांला देखील त्याच्या निकटतेचा अनुभव होईलच. गुन्हेंगारांनो, आपले हात शुद्ध करा, द्विबुद्धी बाळगणाऱ्यांनो! आपली अंतःकरणे पवित्र करा. [9] दुःखी व्हा, विलाप करा आणि रडा. तुमचे हास्य रडण्यात आणि आनंद निराशेत बदलून जावे. [10] परमेश्वराच्या दृष्टीने स्वतःला नम्र करा आणि तो तुम्हांला आदर सन्मान देईल.
[11] एकमेकांविषयी अपशब्द बोलू नका. जो आपल्या भाऊबहिणींविरूद्ध बोलतो, त्यांची निंदा व टिकाटिपण्णी करितो इतकेच केवळ नव्हे तर त्यांच्यावर दोष लावतो, तो परमेश्वराचा नियम दोषी ठरवून त्याची बदनामी करितो. तुम्ही जर परमेश्वरी नियमांवर दोष लाविता, तर तुम्ही नियमांचे पालन करून त्यानुसार चालणारे नाही. परंतु नियम दोषी ठरविणारे झाला आहा. [12] नियम देणारा केवळ एकच आहे आणि फक्त त्यांलाच उद्धार करण्याचा व नाश करण्याचा अधिकार आहे, मग तुम्ही कोणालाही दोषी ठरविणारे आहा तरी कोण?
[13] जे तुम्ही असे म्हणता की या दिवसांत आणि येणाऱ्या दिवसांत, एखाद्या दुसऱ्या शहरात जाऊ आणि एक वर्ष व्यापार करून काही कमाई करू. [14] खरी गोष्ट हीच आहे, की तुम्हांला ठाऊकच नाही की उद्या काय होणार आहे, तुमचे

जीवन आहे तरी काय? ते वाफेसारखे आहे, जी थोडा वेळ दिसते नंतर नाहीशी होते. 15 त्याऐवजी तुम्ही असे
म्हणावयास हवे, “की जर येशूंची इच्छा असेल तर आपण जगू आणि हे किंवा ते कार्य करू.” 16 पण तुम्ही तर आपल्या
योजनांविषयी गर्विष्ठ आहा. प्रत्येक प्रकारचा गर्व वाईट आहे. 17 म्हणून भलेपणाची कृत्यें करणे चांगले आहे हे ज्याला
कळते, पण तो तसे करीत नाही तर हा गुन्हा आहे. (त्याचा गुन्हा ठरतो).

# 5

1 हे धनवानांनो ऐका, तुमच्या भविष्यात तुमच्यावर ज्या भयंकर पीडा व जे क्लेश येणार आहेत, त्याविषयी रडा आणि
विलाप करा. 2 तुमची दौलत (धन) नष्ट झाली आहे, तुमचे वस्त्र किटकांनी खाऊन टाकले आहे. 3 तुमचे सोनेचांदी जंगले
आहे. त्यांचे नासणे, जंगणे आणि नासणे हीच तुम्हांविरूद्ध साक्ष होईल. ज्या धनावर तुमचा भरंवसा होता तेच तुमचे
शरीर अग्नीप्रमाणे खाऊन टाकेल. जो खजिना तुम्ही साठविला आहे, तोच न्यायाच्या दिवशी तुमच्याविरूद्ध साक्ष देईल.
4 पहा, ज्या मजूरांनी तुमची शेतें कापली, त्यांची मजूरी तुम्ही हिसकली, स्वतः घेतली. त्यांची मजूरी तुमच्याविरूद्ध
ओरडत आहे, पीक कापणाऱ्यांची हाक सर्वसामर्थ्यी प्रभूच्या कानी पोहचली आहे. 5 या पृथ्वीवर तुम्ही आपली प्रत्येक
इच्छा पूर्ण करण्यासाठी व विलासमय जीवन जगण्यासाठी जीवन गमाविले, व्यर्थ केले. तुम्ही आपले अंतःकरण
वधाच्या दिवसासाठी जाडे व ताजेतवाने करून टाकले आहे. 6 जे लोक आपले रक्षण स्वतः करू शकत नव्हते, त्यांना
तुम्ही दोषीही ठरविले व मारूनही टाकले.

7 प्रिय बंधूभगिनींनो, येशूंच्या आगमनापर्यंत धीर धरा. पहा, पहिला व शेवटला पाऊस मिळेपर्यंत (पाहात नाही तो
पर्यंत) शेतकरी भूमीच्या बहुमूल्य पिकांची किती धीराने वाट पाहात असतो; उपज पाहण्यासाठी किती धीर धरून
प्रतिक्षा करीत असतो! 8 येशूंचे आगमन समीप आहे, म्हणून तुम्ही देखील धीर बाळगून आपली अंतःकरणें मजबूत करा,
स्थिरता बाळगा. 9 एकमेकांविषयी कुरकुर करू नका, कारण तसे केले तर तुम्ही दोषी ठराल म्हणून परमेश्वर तुम्हांला
दंड देईल. पहा, न्यायाधीश दाराजवळ उभा आहे.

10 माझ्या भाऊबहिणींनो, धीर धरण्यासंबंधी तुम्ही त्या संदेष्टयांचे स्मरण करा, ज्यांनी दुःख सहन केले, धीर धरला व
ज्यांनी प्रभूतर्फे आपल्याला त्याविषयीची सूचना व ताकीद दिली होती. 11 प्रियांनो, ज्यांनी धीराने सहन केले, करीत
राहिले, त्यांना आम्ही विपुल आदर देतो. धीराने सहन करणाऱ्यांपैकी ईयोब हा एक प्रभावी नमूना आहे. ईयोबाच्या
अनुभवावरून आपण शिकून त्यावरून असा कित्ता घेऊ शकतो, की सरतेशेवटी परमेश्वराच्या योजनेने त्याचा अंत
भलेपणाची कृत्यें या रूपाने कसा घडवून आणला, याचे कारण हेच आहे की प्रभू कोमल आणि कृपाळू देखील आहे.

12 माझ्या बंधूभगिनींनो, सर्वाधिक महत्वाची बाब स्मरणात असू द्या की स्वर्गाची (आकाश), पृथ्वीची किंवा दुसरी
कशाचीही शपथ वाहू नका, स्पष्ट स्पष्ट होय किंवा नाही म्हणा, म्हणजे तुमच्याद्वारे गुन्हा घडू नये आणि तुम्ही दोषी ठरू
नये व दंडापासून मुक्त रहावे.

13 तुमच्यापैकी कोणी दुःख सहनातून जातो आहे काय? दुःख सहन करितो आहे काय? मग त्याने परमेश्वराची प्रार्थना
करून त्यांला सांगावे. कोणी आनंदित आहे काय? मग आनंदाने त्याने भजन गावे. 14 तुमच्यापैकी कोणी आजारी आहे
काय? मग त्या आजाऱ्याने चर्चच्या वडिलांना बोलवून घ्यावे, वडील चर्चने प्रभूच्या नांवाने त्याला तेल लावावे व
त्याच्यासाठी कळकळीने प्रार्थना करावी. 15 विश्वासाने केलेली प्रार्थना, आजाऱ्याला बरे करील. येशू त्याला उठवून उभा
करतील आणि जर त्याने अपराध केले असले तरीही ते क्षमा केले जातील.

16 दुसऱ्यांविरूद्ध केलेली आपली अपराधें कबूल करा, एकमेकांसाठी प्रार्थनेद्वारे परमेश्वराला मागा, त्याचा परिणाम
असा होईल की तुम्ही निरोगी व्हाल. अपराध क्षमा-प्राप्त झालेल्या, मनुष्याच्या प्रभावी आणि ठामपणे केलेल्या
कळकळीच्या प्रार्थनेमुळे विपुल फायदा होतो.

17 एलीया देखील आपल्यासारखाच एक मनुष्य होता. त्याने प्रामाणिकपणे-निश्चयपूर्वक कळकळीने प्रार्थना केली की
पाऊस पडू नये आणि असेच झाले. जवळजवळ साडेतीन वर्षे, पृथ्वीवर पाऊस पडला नाही; 18 जेव्हा त्याने पुन्हा

प्रार्थना केली, तेव्हा पाऊस पडला आणि भूमीने अन्न उपजविले.

[19] माझ्या प्रिय बंधूभगिनींनो, जर तुमच्यातील कोणी सत्यापासून बहकला आणि एखाद्याने त्याला परत सत्य मार्गांवर आणले असेल, [20] तर जो एखाद्याला चुकलेल्या मार्गापासून माघारी आणतो, तो त्याचा आत्मा नरकापासून वाचवितो, त्याला आध्यात्मिक मरणापासून वाचवितो आणि त्याचे असंख्य अपराध झाकतो, हे त्या वाचविणाऱ्याने ध्यानात ठेवावे व त्याला याविषयी कळावे.